**<u>फौ.कि.अर्ज क्र. १४/२०२३</u>**
**<u>सलमाबानो व इतर वि. शेख रियाज मोहम्मद</u>**

**<u>निशाणी क्र. १३ वरील आदेश</u>**
**<u>( पारित दिनांक १७.०८.२०२४)</u>**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार यांनी सादर करुन असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ह्या मुळतः नवापुर तालुक्यातील रहिवासी नसुन ते मालेगांव येथील रहिवासी आहेत व तसा उल्लेख त्यांचे आधारकार्ड, मतदानकार्ड, रहिवासी दाखला व इतर दस्तात स्पष्टपणे आहे असे असतांनाही केवळ गैरअर्जदार यांना त्रास द्यावा या हेतुने सदरील प्रकरण नवापुर तालुक्यामध्ये दाखल करण्यात आले आहे व अर्जदार हया नवापुर येथील रहिवासी नसल्यामुळे या न्यायालयात सदर प्रकरण चालविण्याचे अधिकारक्षेत्र नाही. गैरअर्जदार यांनी सदरील न्यायालयास प्रस्तुत प्रकरण चालविण्याचे न्यायक्षेत्र निर्माण होत नसल्यामुळे प्रकरण निकाली काढावे अशी विनंती केली आहे.

२. अर्जदार यांचे विधीज्ञ यांनी सदरील अर्जावर म्हणणे सादर करुन अर्जदार हे सध्या नवापुर तालुक्यात राहत असुन या न्यायालयास प्रकरण चालविण्याचे अधिकारक्षेत्र आहे असे कथन करुन अधिकारक्षेत्राचा मुद्दा अंतीम सुनावणीचे वेळी विचारात घ्यावा व प्रकरणाची सुनावणी घ्यावी आणी गैरअर्जदाराचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. उभयपक्षकारांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांचा तात्पुरता रहिवास हा देखील तेथील न्यायालयास अर्जदाराचे प्रकरण चालविण्याचे अधिकारक्षेत्र निर्माण करतो. अर्जदाराचे रहिवासाबाबतचा पुरावा सुनावणी दरम्यान विचारात घेऊन त्यावर अंतीम युक्तीवादाचे वेळी भाष्य करता येणे शक्य आहे. अशा परिस्थितीत प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील सुनावणी घेण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो..

**<u>आदेश</u>**

अधिकारक्षेत्राचा मुद्दा अंतीम न्यायनिर्णयाचे वेळी ठरविता येईल त्यामुळे सदरील आक्षेप सद्यस्थितीत विचारात न घेता प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील सुनावणी घेण्यात येत आहे. उभयपक्षकरांनी नोंद घ्यावी.

PANKAJ RAMDAS PHULARI
Digitally signed by PANKAJ RAMDAS PHULARI
Date: 2024.08.22 15:50:07 +0530

नवापुर
दिनांक १७.०८.२०२४

**(पंकज रा. फुलारी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नवापुर.